# * रसविचार *

- साहित्यात , एकूण नऊ रस आहेत -

१) करूण  २) शांत  ३) रौद्र
४) हास्य  ५) अद्भुत  ६) बीभत्स
७) भयानक  ८) शृंगार  ९) वीर

- स्थायिभाव -

१) विस्मय  २) भय  ३) दु:ख  ४) कंटाळा
५) उत्साह  ६) आनंद  ७) शोक  ८) राग

## * प्रश्नांचे स्वरूप

१) कोणतेही चार स्थायिभाव लिहा.
→ उत्साह , आनंद , शोक , भय

२) पुढील तक्ता पूर्ण करा :-

नऊ रस →

| | | |
|---|---|---|
| करूण | शांत | रौद्र |
| हास्य | अद्भुत | बीभत्स |
| भयानक | शृंगार | वीर |

३) पुढील वाक्यातील रस ओळखा-

१) कडक थंडीच्या दिवसात एक म्हातारा भिकारी चिरगुटे टाकून व पांघरून कुडकुडत बसल्याचे मी पाहिले - करुण रस

२) मी सुटकेसमधली 'पुत्पकित' शाल काढली - हास्य रस

३) या शाली घेऊन मी आता 'शालीन' बनू लागलो आहे - हास्य रस

४) मी अत्यंत केविलवाण्या स्वरात सध्या मी 'डायट' वर असल्याचे सांगितल्यावर सर्वांनी मला वेड्यात काढले - करुण रस

५) कोबी, कॉलिफ्लॉवर वगैरे बाळसेदार मंडळींची स्वयंपाकघरातून हकालपट्टी झाली - हास्य रस

६) गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार ~~वीर~~ - वीर रस

७) त्या साऱ्या वस्तूंकडे बघत-बघत अब्दुलाचे डोळे पाण्याने काठोकाठ भरून आले - करुण रस

८) काय चमत्कार पाहा ! आकाशात एकाचवेळी पाऊस व चांदणे यांचा अनोखा संगम दिसत होता. - अद्भुत रस

OPPO A9 2020

## ★ वाक्यरूपांतर ★

★ खालील तक्ता पूर्ण करा.

| वाक्य | वाक्यप्रकार | सूचनेनुसार बदल करा. |
|---|---|---|
| अ) किती सुंदर आहे ताजमहाल! | उद्गारार्थी | ताजमहाल खूप सुंदर आहे. |
| आ) तुझ्या भेटीने खूप आनंद झाला. | विधानार्थी | किती आनंद झाला तुझ्या भेटीने. |
| इ) शाळेच्या भल्यासाठी मुख्याध्यापकांनी खूप काही केले. | विधानार्थी | शाळेच्या भल्यासाठी मुख्याध्यापकांनी खूप काही केले, नाही का? |
| ई) ते काम खूप मोठे आहे. | होकारार्थी | ते काम काही लहान नाही. |
| उ) प्रवासात भरभरून बोलावे | विधानार्थी | प्रवासात भरभरून बोला. |
| ऊ) पांढरा रंग कोणाला आवडत नाही? | प्रश्नार्थी | पांढरा रंग प्रत्येकाला आवडतो. |

२) पुढील विधानार्थी वाक्याचे पुढील प्रकारात रूपांतर करा:

विधानार्थी वाक्य - हे अक्षर खूप चांगले आहे.

१) प्रश्नार्थी वाक्य - हे अक्षर खूप चांगले आहे, नाही का?

२) उद्गारार्थी वाक्य - किती ~~सुंदर~~ चांगले आहे हे अक्षर!

३) आज्ञार्थी वाक्य - अक्षर ~~सुंदर~~ ~~काढा~~ चांगले काढा.

४) नकारार्थी वाक्य - हे अक्षर काही वाईट नाही.

प्र.३) पुढील वाक्यांचे प्रकार ओळखा:

१) मुलांनो, रांगेत चाला. → आज्ञार्थी वाक्य

२) तुला पेढा आवडतो का? → प्रश्नार्थी वाक्य

३) अरेरे! फारच वाईट झाले! → उद्गारार्थी वाक्य

४) माझे घर नदीकिनारी आहे. → विधानार्थी (होकारार्थी) वाक्य.

प्र.४) पुढील होकारार्थी वाक्ये नकारार्थी करा.

१) नेहमी चांगले वागावे.
→ कधीही वाईट न वागावे.

२) आई रात्रभर जागी होती.
→ आई रात्रभर झोपी नव्हती.

३) भारतीय सेना युद्धात विजयी झाली.
→ भारतीय सेना युद्धात पराभूत नाही झाली.

४) समीरला थोडीच पुस्तके हवीत.
→ समीरला ~~जास्त~~ जास्त पुस्तके नकोत.

OPPO A9 2020

प्र.५) कंसांतील सूचनांप्रमाणे वाक्यांत बदल करा :

१) किती पाऊस पडला काल रात्री! (विधानार्थी करा.)
→ काल रात्री खूप पाऊस पडला.

२) ही इमारत खूप उंच आहे. (उद्गारार्थी करा.)
→ किती उंच आहे ही इमारत!

३) आज पहाटे रानात उजेड नव्हता. (होकारार्थी करा.)
→ आज पहाटे रानात अंधार होता.

४) साहित्याचे रंग फुलले आहेत. (नकारार्थी करा.)
→ साहित्याचे रंग कोमेजलेले नाहीत.

५) दररोज अभ्यास करावा. (आज्ञार्थी करा)
→ दररोज अभ्यास करा.

६) तू कोणत्या शाळेत जातेस ते मला सांग. (प्रश्नार्थी करा.)
→ तू कोणत्या शाळेत जातेस ?

प्र.६ अ) पुढील वाक्ये नकारार्थी करा:

१) नेहमी हसत हसत जगावे.
→ कधीही ~~रड~~ रडत रडत जगावे नाही.

२) हे चित्र मला पसंत आहे.
→ हे चित्र मला नापसंत नाही.

OPPO A9 2020

३) नवीन वस्त्रे धारण करावीत.
→ जूने वस्त्र धारण न करावीत.

आ) पुढील वाक्ये होकारार्थी करा :

१) आत जाण्याचे सर्व मार्ग खुले नव्हते.
→ ~~बाहेर जाण्याचे सर्व मार्ग खुले होते.~~
→ आत जाण्याचे सर्व मार्ग बंद होते.

२) ते काम लहान नाही.
→ ते काम मोठा आहे.

## मोठे होत असलेल्या मुलांनो...

- डॉ. अनिल काकोडकर

प्र.१) टिपा लिहा.

(अ) बार्क

→ बार्क म्हणजे B.A.R.C. म्हणजेच 'भाभा अॅटॉमिक रिसर्च सेंटर' चे रघुरूप आहे. बार्कला मराठीत 'भाभा अणुसंशोधन केंद्र' असे म्हणतात. डॉ. होमी भाभा हे भारतातील थोर अणुशास्त्रज्ञ होते. त्यांनी भारतमध्ये अणुसंशोधनाचा पाया घातला. भारताच्या अणुसंशोधन केंद्राला दिले आहे. 'बार्क' ही संस्था प्रचंड मोठी व नावाजलेली आहे. ही संस्था अणुऊर्जेसंबंधित संशोधनाचे महत्त्वपूर्ण कार्य आजतागायत निष्ठेने करीत आहे.

आ) डॉ. होमी भाभा

→ डॉ. होमी भाभा हे भारतातील विश्वविख्यात अणुशास्त्रज्ञ होते. त्यांनी भारतातील अणुसंशोधनचा पाया घातला. म्हणून त्यांचे नाव अणुसंशोधन केंद्राला दिले आहे. B.A.R.C म्हणजे भाभा अॅटॉमिक रिसर्च सेंटर! त्यांचे व्यक्तिमत्त्व तरुण नवीन शास्त्रज्ञ पिढीला स्फूर्तिदायक होते. लेखकांनी त्यांच्याबद्दल सांगितलेली एक आठवण आहे - लेखक जेव्हा ट्रेनिंग स्कूलला शिकत असताना, तिथे होमी भाभा तीन-चार वेळा आले होते. मुलामुलींनी त्यांना विचारले की अम्हा सर्वांना पुरेल इतके काम आहे का? तेव्हा भाभा म्हणाले की तुम्ही चिंता करू नका. OPPO A9 2020 [illegible] संशोधन करा. तुम्ही स्वतःच काम निर्माण करा. काय काम करायचे ते तुम्ही स्वतःच ठरवा. बॉसने सांगितले तेवढेच काम करायचे ही प्रवृत्ती चुकीची आहे. या उद्‌गारातून होमी भाभा यांचा संशोधनाच्या बाबतीतला सकारात्मक दृष्टिकोन दिसून येतो.

प्र.२) 'स्काय इज द लिमिट' ही परिस्थिती केव्हा निर्माण होऊ शकते, ते पाठाच्या आधारे लिहा.

→ डॉ. होमी भाभा यांच्या मते, स्वतःच काम निर्माण करणे व काय काम करावे, हे स्वतःच ठरवणे हा सकारात्मक विचार प्रत्येकाने करायला हवा. बॉसने सांगितले तेवढेच काम करणे, ही खोटी प्रवृत्ती आहे. चिंता करीत न बसता, कार्यरत व कार्यमग्न असले की स्काय इज द लिमिट ही परिस्थिती निर्माण होते. कोणीतरी बोट धरून चालवेल, मार्ग दाखवेल ही स्थिती आरंभी ठीक आहे परंतु शेवटी स्वतःचे मार्ग स्वतः शोधणे, ऊर्जा मिळवणे व क्षमतेने सक्षम होणे हे ध्येय असावे. यालाच 'स्काय इज द लिमिट' असे म्हटले आहे.

प्र.३) मेटलायझिंग प्रक्रियेवर काम न होण्यामागची कारणे कोणती असावीत, असे तुम्हाला वाटते?

→ बार्कमध्ये लेखक इंजिनियर म्हणून रुजू झाले. तेव्हा त्यांना मेटलायझिंग प्रक्रियेवर काम न होण्याची कारणे कळतात. तिथे सगळी यंत्रसामग्री असली तरी, कोणी वापरत नाही. इंजिनियरला वेल्डर व फोरमन लागतात. परंतु कुणाचीही मदत न घेता इंजिनियरने आधी सर्व कामे करायला हवीत. स्वतः सगळी कामे इंजिनियरला आली तर मग त्याला इतर माणसे हाताखाली मिळतील व ते आनंदाने काम करतील.

आपल्याला येत नसताना दुसऱ्याला काम सांगणे योग्य नाही. प्रथम आधी काम करायचे मग इतरांना सांगायचे, हे घडत नसल्यामुळे भेटल्यावशिंग प्रक्रियेवर काम होत नाहीत.

प्र.४) 'आधी केले, मग सांगितले' या उक्तीची यथार्थता स्पष्ट करा.

→ समर्थ रामदासांचे असे सुवचन आहे की 'आधी केले मग सांगितले!' या उक्तीतून फार मोठा मोलाचा संदेश संत रामदासांनी दिला आहे. आपल्याला एक भारी वाईट सवय असते, ती म्हणजे आपली कामे दुसऱ्यांनी करावीत. आपल्या आळशी प्रवृत्तीतून 'देरे हरी। खाटल्यावरी' अशी मनोभावना तयार होणे गैर आहे. आपण परावलंबी न होता, स्वतःची कामे स्वतः करण्याची धमक आपल्यात असायला हवी. आपण स्वतः आपली कामे करण्यात सक्षम असलो की आपण आपले उदाहरण दुसऱ्यांना दाखवू शकतो. स्वावलंबी होऊन आपली कामे आपण केली की दुसऱ्यांनाही विश्वास वाटतो. मग आपण दुसऱ्यांना आदर्शवत होतो. यालाच 'आधी केले, मग सांगितले' असे म्हणतात.

प्र.५) 'प्रत्यक्ष अनुभवातून शिकणे, हे अधिक परिणामकारक असते,' हे विधान स्वानुभवातून स्पष्ट करा.

→ दिवाळीत रंगीत कागदी कंदिलांची शोभा मला खूप आवडते. आई नेहमी बाजारातून छोटे कंदील विकत आणायची. या वर्षी मी ठरवले की आपण स्वतः कागदी कंदील तयार करायचा. बघू या जमते की नाही ते? मी स्वतः स्टेशनरीच्या दुकानातून रंगीत जिलेटीन, कागद व काड्या आणल्या. सुताचे बंडल आणले. नि

OPPO A9 2020

दिवाळीच्या आदल्या सकाळी कंदील करायला घेतले. चौकोनात काड्या जोडायला घेतल्या. पण काही मनासारखे जमेना. दुपार झाली मी पुन्हा विस्कटायचो पुन्हा जोडायचो. नीट जमत नव्हते पण निर्धार केला की कंदील पूर्ण झाल्याशिवाय जेवायचो नाही. हळूहळू मला ते जमायला लागले. पूर्ण कंदीलाचा काड्यांचा सांगाडा तयार झाला. मग त्यावर ताणून वेगवेगळे रंगीत कागद चिटकवणे सोपे गेले. अखेर खूप मेहनतीनंतर सुंदर कंदील तयार झाला. तेव्हा मला कळले की, 'प्रत्यक्ष अनुभवातून शिकणे हे अधिक परिणामकारक असते.'

प्र. दोन दिवस

- नारायण सुर्वे

दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दुःखात गेले.
हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे
शेकडो वेळा चंद्र आला ; तारे फुलले ,रात्र धुंद झाली;
भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली.

हे हात माझे सर्वस्व ; दारिद्र्याकडे गहाणच राहिले
कधी माना उंचावलेले ,कधी कलम झालेले पाहिले
हरघडी अश्रू वाळविले नाहीत; पण असेही क्षण आले
तेव्हा अश्रूच मित्र होऊन साहाय्यास धावून आले.

दुनियेचा विचार हरघडी केला ,अगा जगमय झालो
दुःख पेलावे कसे ,पुन्हा जगावे कसे, याच शाळेत शिकलो
झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले
दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दुःखात गेले.

कृती

प्र.१] कृती पूर्ण करा.

अ] 'रोजची भूक भागवण्यासाठी कराव्या लागणाऱ्या कष्टांमुळे आयुष्याचे दिवस वाया गेलेत' या आशयाची कवितेतील ओळ शोधा.
→ भाकरीच्या चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली.

आ) कवीचा प्रयत्नवाद आणि आशावाद दाखवणारी ओळ लिहा.
→ दुःख पेलावे कसे, पुन्हा जगावे कसे, याच शाळेत शिकलो.

प्र.२) एका शब्दांत उत्तर लिहा.

अ] कवीचे सर्वस्व असलेली गोष्ट - हात

आ) कवीचा जवळचा मित्र - अश्रू

प्र.३) खालील शब्दसमूहांचा तुम्हांला कळलेला अर्थ लिहा.

अ) माना उंचावलेले हात - हात म्हणजे काम करण्याचा कर्तृत्व होय. ते आमचे सर्वस्व आहे ; जरी दारिद्र्याकडे गहाण असले तरीही कधी कधी अभिमानाने उंच करते आमचे मान.

आ) कलम केलेले हात - या हातांनी कष्ट केले आहे. कधी ते दारिद्र्यात राहिले, कधी ते अभिमानाने मान उंच केले. कधी अशी वेळ परिस्थितीमुळे आली की ते जायबंदीही झाले. कलम केलेले म्हणजे बळजबरीने बांधलेले होय.

OPPO A9 2020

ड) दारिद्र्याकडे गहाण पडलेले हात - कष्टकऱ्यांचे हात हेच त्यांचे सर्वस्व असते. हातांनी ते कष्ट उपसतात व उदरनिर्वाह करतात. पण तेवढ्याने पोट भरत नाही, कारण दैन्य दारिद्र्यात ते खितपत पडलेले असतात. त्यांना उद्याच्या निर्वाहाची काळजी असते. हे दुःख व्यक्त करताना कवी म्हणतात - जणू कामगारांचे हात दारिद्र्यामुळे गहाण पडलेले आहेत. तारण म्हणून ठेवलेले आहेत.

## प्र.७) काव्यसौंदर्य

अ) खालील ओळींचे रसग्रहण करा.

'दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दुःखात गेले
हिशेब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे'

→ • आशयसौंदर्य : 'दोन दिवस' या कवितेतून कवी नारायण सुर्वे यांनी कामगारांच्या वास्तव जीवनाचे व त्यांच्या मनोव्यथेचे चित्रण केले आहे. दारिद्र्याकडे गहाण पडलेले कामगारांचे आयुष्य असले, तरी प्राप्त परिस्थितीत दृढ मनःशक्तीने लढत राहण्याची जिद्द या कवितेत सुर्वे यांनी यथार्थपणे शब्दबद्ध केली आहे.

• काव्यसौंदर्य : प्रस्तुत ओळीमध्ये माणसाच्या आयुष्याची क्षणभंगुरता सांगताना कवी म्हणतात - कामगारांचे जीवन खरे तर चार दिवसांचे आहे. त्यातील दोन दिवस सुख-समृद्धीची वाट पाहण्यात गेले, तर उरलेले दोन दिवस पोटपाण्याची विवंचना करताना दुःखात गेले. खडतर आयुष्य, जीवन जगताना इच्छा व उमेद संपत आली. वयाचा जमाखर्च मांडतो आहे. आता किती उन्हाळे, किती ऋतू जगायचे उरलेत याचा हिशोब करतो आहे.

• भाषिक वैशिष्ट्ये : वरील ओळींतील विधानात्मक थेट रचनेमुळे दुःखाचा आवेग रसिकापर्यंत तडक भिडतो. सहज सोप्या शब्दांत वास्तवाची दाहकता प्रत्ययकारीरीत्या मांडली आहे. 'किती उन्हाळे' या शब्दसंघटनेतून उन्हाने रापलेल्या खडतर आयुष्याचा प्रत्यय येतो. कामगारांच्या जीवनातील भयाण वास्तवाचे चटके जाणवतात.

आ) 'दुःख पेलावे' आणि 'पुन्हा जगावे' या वाक्यमागील तुम्हाला जाणवलेला विचार तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

→ कवी नारायण सुर्वे यांनी 'दोन दिवस' या कवितेत कामगारांचे जीवन किती दुःख व व्यथांनी भरलेले असते याचे वास्तव व विदारक चित्र प्रत्ययकारी शब्दांत रेखाटले आहे.

कामगाराच्या भूमिकेतून कवी म्हणतात - मी कधी स्वार्थीपणाने वागलो नाही. दुःख झेलत असतानाही मी जगमय झालो. अनुभवाच्या शाळेत मी शिकलो. दुःखाने पिचलो नाही, पुन्हा ठामपणे उभा राहिलो. 'दुःख पेलावे' या संकल्पनेतून कवींना असे म्हणायचे आहे की, दुःखाने दबून न जाता त्याचा मुकाबला करावा. दुःख पचवावे व पुन्हा आपले जीवन मानाने जगावे. 'पुन्हा जगावे' या संकल्पनेतून दुर्दम्य आशावाद व्यक्त होतो.

OPPO A9 2020

दुःखावर विजय मिळवावा, हा निर्धार त्यातून दिसून येतो; 'सुख पाहता जवा पडे । दुःख पर्वताएवढे' हे समजून घेऊन दुःख आपलेसे करून, कणा मोडू न देता जगण्याचा मंत्र जपला.

इ) कवितेत व्यक्त झालेल्या कष्टकऱ्यांच्या जीवनाविषयी तुमच्या भावना लिहा.

→ प्रस्तुत कवितेमध्ये कवींनी कामगारांच्या दाहक जीवनाचे वास्तव चित्रण केले आहे.

कष्टकऱ्यांच्या जीवनातील व्यथा मांडताना कवी म्हणतात- आयुष्य तर अवघ्या चार दिवसांचे आहे. त्यातील अर्धे आयुष्य सुखाची वाट पाहण्यात व अर्धे आयुष्य दुःख झेलण्यात गेले. सुखाची भूल दुरून चकाकणाऱ्या चंद्रासारखीच होती; पण भाकरीच्या चंद्र शोधण्यात हयात बरबाद झाली. खूप कष्ट उपसले. दैन्यदारिद्र्याकडे आयुष्य गहाण पडले. कधी माझ्या कर्तृत्ववान हातांनी अभिमानास्पद कामगिरी केली; पण बऱ्याचदा हात कलम केले गेले. अश्रूंनी माझे मित्रांसारखे सांत्वन केले. भ्रोतभट्टीत पोलाद शेकावे तसे माझे सबंध आयुष्य शेकून निघाले. सारा समाज आपलासा केला, तरी सर्व आयुष्य दुःखात गेले.

ई) 'कवितेत व्यक्त झालेले जीवनसत्य,' याबाबत तुमचे विचार स्पष्ट करा.

→ 'दोन दिवस' या कवितेत नारायण सुर्वे यांनी कष्टकऱ्यांच्या वेदनामय जीवनाचे वास्तव चित्र दाहक

OPPO A9 2020

शब्दांत स्पष्ट केले आहे.

पोटाच्या भुकेसाठी, दोन घासांसाठी पूर्ण हयात खर्ची पडली. त्या दिवसांत फक्त अश्रूंची साथ लाभली. भाकरीचा चंद्र शोधण्यात जीवन गेले. दुनियेतील माणसांची दुःखे आपलीशी केली. भ्रोतभट्टीत जिणे शेकवले. हात म्हणजे कर्तृत्व! या हातांनी अतोनात कष्ट उपसले. कधी ते नाकर्ते झाले. कधी दारिद्र्याकडे गहाण पडले. तरीही धीर सोडला नाही. दुःख कसे झेलावे, कसे सहन करावे, हे या अनुभवाच्या शाळेत शिकलो. आयुष्यात बरेवाईट प्रसंग आले ते निभावून नेले. दोन दिवस सुखाची वाट पाहण्यात गेले, दोन दिवस दुःखात गेले.

अशा प्रकारे कवितेत कष्टकऱ्यांच्या जीवनाचे सत्य विदारकपणे व्यक्त झाले आहे.

×

## शब्दसंपत्ती

### * शब्दसमूहाबद्दल एक शब्द

१) दर दिवशी प्रसिद्ध होणारे - दैनिक

२) दर सप्ताहाला प्रसिद्ध होणारे - साप्ताहिक

३) दर पंधरा दिवसांनी प्रसिद्ध होणारे - पाक्षिक

४) दर महिन्याला प्रसिद्ध होणारे - मासिक

५) दर वर्षाला प्रसिद्ध होणारे - वार्षिक

६) अरण्याचा राजा - वनराज

७) आपल्या लहरीप्रमाणे वागणारा - स्वच्छंदी

८ ईश्वर आहे असे मानणारा - आस्तिक

९) ईश्वर नाही असे मानणारा - नास्तिक

१०) भाषण ऐकणारे - श्रोते

११) कविता करणारा - कवी

१२) गाणे गाणारा - गायक

१३) केलेले उपकार जाणणारा - कृतज्ञ

१४) केलेले उपकार विसरणारा - कृतघ्न

१५) दगडाच्या मूर्ती घडवणारा - शिल्पकार

१६) मूर्ती बनवणारा - मूर्तिकार

१७) कोणावरही अवलंबून नसलेला - स्वावलंबी

१८) दुसऱ्यावर अवलंबून असलेला - परावलंबी

१९) पाहण्यासाठी आलेले लोक - प्रेक्षक

२०) भाषण करणारा - वक्ता

२१) रोग्यांची शुश्रूषा करणारी - परिचारिका

२२) लिहिता - वाचता येणारा - साक्षर

२३) लिहिता - वाचता न येणारा - निरक्षर

२४) तंत्रज्ञानाची जाण असणारा - तंत्रज्ञ

२५) मत देणारा - मतदार

OPPO A9 2020

* एका शब्दाचे अनेक (भिन्न अर्थ

(१) अंतर → (१) मन (२) भेद (३) लांबी

(२) अंबर → (१) आकाश (२) वस्त्र (कपडा)

(३) अभंग → (१) न भंगलेला (२) काव्यरचनेचा एक प्रकार

(४) कर → (१) हात (२) सरकारी सारा (३) किरण

(५) कळ → (१) भांडणाचे कारण (२) गुप्त किल्ली (३) वेदना

(६) घाट → (१) डोंगरातील रस्ता (२) नदी किनारी असणाऱ्या पायऱ्या

(७) जलद → (१) लवकर (२) ढग

(८) जीवन → (१) आयुष्य (२) पाणी

(९) तीर → (१) काठ (२) बाण

(१०) तट → (१) किनारा (२) कडा (३) ~~किल्ल~~ किल्ल्याची भिंत

(११) दंड → (१) शिक्षा (२) काठी (३) बाहू

(१२) नाद → (१) आवाज (२) छंद (३) ~~आवड~~ आवड

(१३) नाव → (१) नाम (२) होडी

(१४) पक्ष → (१) पंधरवडा (२) वादातील एक बाजू (३) राजकीय संघटना (४) पंख

(१५) पय → (१) पाणी (२) दूध

(१६) पाणी → (१) जल (२) हात

(१७) पूर → (१) नगर (२) पाण्याचा लोंढा

(१८) भाव → (१) भावना (२) दर (३) भक्ती (४) किंमत

(१९) मान → (१) शरीराचा एक अवयव (२) प्रतिष्ठा

(२०) माया → (१) ममता (२) ~~धन~~ धन

(२१) माळ → (१) फुलांचा सर (२) ओसाड जमीन

(२२) वर → (१) आशीर्वाद (२) पती (नवरा) (३) वरची दिशा

(२३) वात → (१) वारा (२) ज्योत (३) एक विकार

(२४) सुमन → (१) फूल (२) पवित्र मन

(२५) हार → (१) पराभव (२) फुलांची माळ (माला)

×

OPPO A9 2020